गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

वर्ष १ ले ● अंक ३२९ वा ● शुक्रवार १९ एप्रिल २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 1 | Issue 329 | Date : 19/04/2024 blow Friday Page 4 Price 4

## विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्षाची सुरवात १३ जूनपासून!

सोलापूर/प्रतिनिधीः २०२३-२४ या शैक्षणिक वर्षातील अंतिम सत्राची परीक्षा लांबल्याने विद्यार्थ्यांना ऐन उन्हाळा सुटीत देखील निकालाच्या (फोटोकॉपी, निकालातील त्रुटी) अनुषंगाने विद्यापीठात किंवा महाविद्यालयांमध्ये हेलपाटे मारावे लागणार आहेत. सध्या सुरू असलेल्या परीक्षा ३० मेपर्यंत चालणार आहेत. पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांची परीक्षा ९ मेपासून सुरू होतील, त्यात अभियांत्रिकीच्या परीक्षा १३ मेपासून सुरू होऊन मेअखेरीस संपणार आहे.कोरोनापासून विद्यापीठाच्या परीक्षांचे वेळापत्रक अजूनही रूळावर आलेले नाही. दोन सत्र परीक्षांमध्ये किमान ९० दिवसांचे अंतर अपेक्षित आहे. त्यामुळे सध्या सुरू असलेल्या परीक्षेचे नियोजन दोनवेळा बदलावे लागले. आता साधारणत: उच्च महाविद्यालयांना ३० मेनंतरच सुट्या लागतील अशी सद्य:स्थिती आहे. त्यानंतर लगेचच १३ जूनपासून विद्यापीठाचे सत्र सुरू होणार आहे. परीक्षा विलंबाने सुरू झाल्याने निकाल मेअखेरीस व जूनमध्ये जाहीर होणार असल्याने विद्यार्थ्यांना फोटोकॉपी व उत्तरपत्रिकांच्या पुनर्मूल्यांकनासाठी त्या सुट्यामध्येच अर्ज करावा लागणार आहे. आता हा गोंधळ आगामी शैक्षणिक वर्षात तरी सुधारेल अशी विद्यापीठ संकुलासह संलग्नित १०८ महाविद्यालयांमधील ६८ ते ७० हजार विद्यार्थ्यांना आहे. जिल्ह्यातील सोलापूर व माढा या दोन्ही लोकसभा मतदारसंघासाठी ७ मे रोजी मतदान होणार आहे. त्यानंतर गॅट, सेट परीक्षा देखील आहेत. या पार्श्र्वभूमीवर विद्यार्थ्यांना ६ ते ८ मे या काळात सुटी असणार आहे. दरम्यान, परीक्षा विलंबाने सुरू झाल्या असल्या तरीदेखील रविवारी पेपर घेण्यात येत नाही. प्रत्येक पेपरसाठी विविध अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांना एक दिवसाची सुटी दिली जात आहे. दररोज तीन सत्रात परीक्षा होत आहे. पण, निवडणुकीच्या प्रशिक्षणामुळे मागील आठवड्यात विद्यापीठाला मनुष्यबळाअभावी दोन पेपर पुढे ढकलावे लागले. त्यामुळे देखील उन्हाळा सुट्यांवर परिणाम होणार आहे.

# पहिल्या टप्प्यासाठी आज मतदान; १९ राज्यांमधील १०२ मतदारसंघ सज्ज



नवी दिल्ली : जगातील सर्वात मोठया लोकशाहीच्या 'उत्सवा'ला आज, शुक्रवारी सुरुवात होत आहे. लोकसभा निवडणुकीतील पहिल्या टप्प्यात देशातील १९ राज्ये व २ केंद्रशासित प्रदेशांमधील १०२ लोकसभा मतदारसंघांमध्ये मतदान होईल. बस्तर आदी नक्षली भागासह संवेदनशील मतदारसंघांमध्ये चोख सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली आहे. पहिल्या टप्प्यात १६.६३ कोटी मतदार १.८७ लाख मतदान केंद्रांवर मतदानाचा हक्क बजावू शकतील. सर्व मतदान केंद्रांवर चोख व्यवस्था करण्यात आली असून १८ लाख कर्मचारी मतदानप्रक्रियेचा कारभार सांभाळतील.

या टप्प्यात १३४ महिलांसह । पान २ वर

### १९ राज्यांमध्ये १०२ मतदारसंघांत जय्यत तयारी

* पहिल्या टप्प्यात देशभरात १०२ मतदारसंघांपैकी ७३ खुल्या गटातील तर अनुसूचित जातींसाठी ११ व अनुसूचित जमातींसाठी १८ मतदारसंघ राखीव आहेत. * अरुणाचल आणि सिक्कीममधील ९२ विधानसभा मतदारसंघांसाठीही मतदान होईल. * मतदान सकाळी ७ ते संध्याकाळी ६ या वेळेत होईल. * पहिल्या टप्प्यातील मतदारांमध्ये ८.४ कोटी पुरुष, ८.२३ कोटी महिला व ११ हजार ३७१ तृतीयपंथीय आहेत. * ३५.६७ लाख प्रथम मतदार आहेत. २०-२९ वयोगटातील ३.५१ कोटी युवा मतदार आहेत. * ४१ हेलिकॉप्टर, ८४ विशेष गाडया व सुमारे १ लाख वाहने निवडणूक व सुरक्षा कर्मचाऱ्यांसाठी तैनात केली आहेत.

## मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत शक्तिप्रदर्शन करत उदयनराजेंनी भरला उमेदवारी अर्ज



वाई : उदयनराजेंनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार, शंभूराज देसाई यांच्या उपस्थितीत आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. या वेळी शिवेंद्रसिंहराजे भोसले जयकुमार गोरे, मकरंद पाटील, महेश शिंदे, धैर्यशील कदम, अशोक गायकवाड उपस्थित होते. भाजपच्या खासदार उदयनराजे भोसले यांनी आज उमेदवारी अर्ज दाखल करताना जंगी शक्तिप्रदर्शन केले, महारॅली काढली. गांधी मैदान ते जिल्हाधिकारी कार्यालय अशी रॅली झाली. या वेळी भाजप, शिवसेना शिंदे गट, राष्ट्रवादी अजितदादा गटाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. महारॅली पोवई नाका येथे आल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस अजित पवार दाखल झाले. त्यांनी यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण केला. त्यानंतर उदयनराजेंनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार, शंभूराज देसाई यांच्या उपस्थितीत अर्ज दाखल केला. या वेळी सर्व आमदार उपस्थित होते.

सातारा लोकसभा मतदारसंघातून महायुतीच्या माध्यमातून भाजपचे खासदार उदयनराजे भोसले यांनी अर्ज दाखल करण्यापूर्वी साताऱ्यात जंगी शक्तिप्रदर्शन करत महारॅली काढली. जलमंदिर पॅलेस या त्यांच्या निवासस्थानापासून । पान २ वर

## दुधनी भीमनगर पाच दिवसापासून अंधारात



अक्कलकोट/प्रतिनिधीः अक्कलकोट तालुक्यातील दुधनी (ग्रामीण) भीमनगर या भागात पाच दिवसापासून पूर्वी अवकाळी वार्ता पावसामुळे खांब पडून वीज गेल्याने येथील नागरीक पाच दिवसापासून अंधारात जिवन जगत आहे. लवकरात लवकर विज कनेक्शन देण्यात यावे अशी मागणी रिपाइं आठवले गट चे जिल्हा उपाध्यक्ष श्री सैदप्पा झळकी यांनी केली आहे. या भागात मोठ्या परवा वादळ व पावसाने विजेचे तीन खांब पडली आहे. संबंधित अधिकार्यांने जातीने लक्ष घालून विज पुरवठा सुरळीत करावे. अशी मागणी श्री झळकी यांनी केली आहे.

## सोलापूरचे लेकीचे जोरदार शक्ती प्रदर्शन; हजारोंच्या उपस्थितीत प्रणिती शिंदे यांनी भरला अर्ज



पंढरपूर/प्रतिनिधीः सोलापूर लोकसभा मतदारसंघातून महाविकास आघाडीच्या उमेदवार पनीती शिंदे यांनी सोलापूरमध्ये मोठे शक्ती प्रदर्शन करत आपला उमेदवारी अर्ज भरला यावेळी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले माजी केंद्रीय गृहमंत्री सुशील कुमार शिंदे उज्वलताई शिंदे यांच्या महाविकास आघाडीतील राष्ट्रवादी शरद पवार गटाचे जिल्हाध्यक्ष बळीराम प्रकाश साठे लिंगायत समाजाचे नेते धर्मराज काडादी विश्र्वनाथ चाकुटे शिवसेना नेते उत्तम खंदारे भगीरथ भालके आदी मान्यवर जिल्हाधिकारी कार्यालयाचे उपस्थित यावेळी सोलापूरच्या लेकीला पाठिंबा देण्यासाठी हजर या संख्येने नागरिक उपस्थित असलेले पाहायला मिळाले पणजी शिंदे यांच्या उमेदवारी अर्ज दाखल करण्यापूर्वी असंख्य कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत जाहीर सभा पार पडली तसेच यानंतर भव्य आहे काढण्यात आली मुरली काँग्रेस भवन मार्गे सिविल चौक बेटरफुल ते सात रस्ता मार्गे जिल्हाधिकारी कार्यालयात परिसरात पोचली रॅलीच्या सुरुवातीला झालेल्या सभेला संबोधित करताना पणती शिंदे यांनी आपल्या आक्रमक शैलीत भाजप सरकारचा भरपूर समाचार घेतला

भाजपने मागच्या दहा वर्षात विश्र्वासाने सोलापूरकरांचा वापर करून मतदान घेतले आणि सत्तेची मजा घेतली आज लोकांना गरज असताना त्यांनी पाठ फिरवली आज अजूनही त्यांच्या उमेदवारी । पान २ वर

## शिक्षक नियुक्ती लांबणीवर..

### आचारसंहितामुळे भावी गुरुजांची नियुक्ती रखडणार..!

### शासनाची जवळपास कोट्यावधी रुपयांची बचत..!!

सोलापूर/प्रतिनिधीः सोलापूर पवित्र पोर्टल मधून जिल्ह्यात आलेल्या नवीन शिक्षकांना आचारसंहितेनंतर म्हणजेच जून महिन्यात नियुक्ती दिली जाणार आहे यामुळे त्यांच्या वेतनाफुटी दिल्या जाणाऱ्या जवळपास कित्येक कोटी रुपयांची बचत शासनाची झाली आहे .

जिल्ह्यात पवित्र पोर्टल मार्फत २४८ शिक्षक हजर झाले आहेत . त्यांच्या कागदपत्राची छाननी व अन्य प्रशासकीय प्रक्रिया शासनाने पूर्ण केली पण नियुक्त्या मात्र दिल्या जात नाहीत

निवडणुकीची धांदल शिक्षकांच्या बदल्या पदोन्नती अतिरिक शिक्षकांच्या समायोजन मुख्याध्यापक व केंद्रप्रमुखांच्या पदोन्नती अशा प्रक्रियेमुळे ही नव्या शिक्षकांच्या नियुक्त्या लांबल्या जात आहेत विद्यमान शिक्षकांच्या बदल्या आणि पदोन्नत्याची प्रक्रिया पूर्ण होण्यापूर्वी नव्यांना नियुक्ती देण्यास शिक्षक संघटना नाही विरोध केला .या प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरच रिक्त झालेल्या जागांची माहिती घेऊन नव्या शिक्षकांना नियुक्ती देण्याचे धोरण जिल्हा परिषदेच्या प्रशासन स्वीकारला आहे .त्यामुळे कागदपत्रांची छाननी होऊनी शिक्षकांना नियुक्त मिळाले नाहीत .यादरम्यान अन्य काही जिल्ह्यात मात्र शिक्षकांना नियुक्तीपत्रे देण्यात आली त्यामुळे तिथे बराच गोंधळ सुरू झाला खुद शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनीही तेथील प्रशासनाला धारेवर धरले बदल्या व पदोन्नती पूर्ण होण्यापूर्वीच नव्याने नियुक्ती का दिल्या ?

तसे जाब विचारला मात्र सांगलीत प्रशासनाच्या सहमत ची धोरण स्वीकारल्याने कोणतेही गोंधळ झाली नाही. नव्या शिक्षकांनी नियुक्तीपत्रे मिळण्यासाठी प्रशासनावर दबाव आणण्याचा प्रयत्न केला त्यालाही प्रशासनाने जुमानले नाही तोपर्यंत लोकसभेची जाहिरात जाहीर झाली आता शिक्षकांना निवडणुका झाल्यानंतर नियुक्त देण्यात येतील अर्थात नव्या शैक्षणिक वर्षात म्हणजे १४ जून रोजी ते शाळेत हजर होतील .

**नवनियुक्त शिक्षकांच्या नेमणुकांसाठी निवडणूक आयोगाकडे मागितली परवानगी**

राज्यात नुकतीच १८ हजार पदांसाठी शिक्षक भरती पार पडली. त्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमधील ११ हजार ८५ शिक्षकांच्या गुणवत्ता यादीनुसार निवडी झाल्या, पण लोकसभा निवडणुकीच्या आचारसंहितेमुळे त्यांना नेमणुका मिळाल्या नाहीत. दुसरीकडे खासगी अनुदानित शाळांमधील पाच हजार पदांची भरती देखील आचारसंहितेत अडकली आहे. समांतर आरक्षणातील । पान २ वर




### तीन महिन्यांचे वेतन थकीत

मार्चमध्ये नियुक्ती दिल्या असत्या तर शिक्षकांचा पहिला महिना शाळा नंतर प्रशासन समजून घेण्यातच गेला असता त्यानंतर १४ जून पर्यंत उन्हाळी सुट्ट्या लागणार होत्या या सुमारे तीन महिन्याचे वेतन शिक्षकांना द्यावे लागले असते प्रशासनाने संयमाने काम केल्याने प्रत्येक शिक्षकाला महिन्याला १६ हजार रुपये प्रमाणे २४८ शिक्षकांचे तीन महिन्याचे वेतन वाचले त्यामुळे ही रक्कम सुमारे एक कोटी रुपये होत आहेत .

## अक्कलकोट तालुक्यात अवकाळी पावसाची हजेरी सांगवी बु येथे वादळी वाऱ्यासह पाऊस; घरावरील पत्रे उडाली, सांगवी बु येथे एक महिला गंभीर जखमी





अक्कलकोट/प्रतिनिधीः अक्कलकोट तालुक्यातील आज अवकाळी पावसाने हजेरी लावली असून सांगवी बु येथे आज संध्याकाळी जोरदार वादळी वाऱ्यासह पाऊस झाला. या भागातील अनेकांच्या घरावरील पत्रे उडाली. दरम्यान, सांगवी बु गावातील शेतातील वस्त्यावरचे पत्रे वादळी वाऱ्याने उडून गेले असून, काही ठिकाणी झाडे उनमळून पडली आहेत. तर काहींच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. उकाड्यामुळे नागरिक हैराण झाले आहेत. सायंकाळी झालेल्या पावसामुळे अनेकांचे घरांचे व शेती मालाचे नुकसान मोठ्या प्रमाणात झाले असून, या वादळी वाऱ्यात अक्कलकोट वागदरी रोड लगत दादाराव भोसले यांच्या शेतातील व्यवसयिक पान टपरी असून, या वादळी वाऱ्यात टपरी दोन ते तीन वेळा उलटून पडली दरम्यान या टपरीत बसलेल्या महिला निर्मला सुरेश भोसले वय -४३ या गंभीर जखमी झाल्या आहेत. त्यांना तातडीने उपचारासाठी दवाखान्यात हलविण्यात आले आहे. गावातील काही जणांच्या घरावरील पत्रे सुमारे शंभर फूट अंतरावर जाऊन पडली. वादळी वाऱ्याने नुकसान झाल्याचे समजताच तलाठी कोतवाल, गावात जाऊन तात्पुरते नुकसानीचा पंचनामा करत आहेत. या वादळी वाऱ्याने विजेच्या तारा तुटून पडल्याने वीजपुरवठा सायंकाळी पासून खंडित असल्याने नागरिक उकड्याने त्रस्त असून, शिवाय विशेष गंभीर बाब म्हणजे अंधारात संसार उपयोगी साहित्य, पत्रे, अन्य वस्तू कुठे उडून गेली आहेत अंधारमुळे शोधणे जिकरीचे ठरत आहे. विजेचे काम तात्काळ पूर्ण करून वीज सुरळीत करावी अशी मागणी ग्रामस्थांतुन होत आहे.शासनाने तात्काळ नुकसानीचे पंचनामे करून तात्काळ मदत द्यावी अशी मागणी गावाकऱ्यातून होत आहे.

# संपादकीय

## उष्णतेची लाट आणि पाणी..

हवामान खात्याने इशारा दिला आहे की, तापमान आता ४० डिग्रीच्या वर जाण्याची शक्यता आहे. या इशाऱ्यातच भावी दुष्काळाचे गर्भित सावट आहे. कारण अजून दुष्काळाची परिस्थिती नसली तरीही ग्रामीण भागात दुष्काळ आणि पाण्याची टंचाई ही संकटे दबक्या पावलांनी येत आहेत. टँकर लॉबी सक्रिय झाली आहे आणि त्यांचा धंदा जोरात होण्यास सुरुवात झाली आहे. सोलापूर व परिसरातील तापमानात दिवसेंदिवस वाढ होत आहे. वाढत्या उन्हामुळे जनजीवन विस्कळीत बनले असून सकाळी दहानंतर घराबाहेर पडणे मुश्कील बनलेआहे. सध्याच उन्हाच्या काहिलीने अंग होरपळत आहे आणि अजून तर मे महिनाही जायचा आहे.

भारतात उष्णतेच्या प्रकोपाचा प्रश्न दरवर्षी असतो आणि ग्रामीण भागात तर त्याची तीव्रता इतकी प्रचंड असते की महिला, मुली डोक्यावर हंडे घेऊन मैलोन्मैल पायपीट करत जाऊन पाणी आणत असतात. हवामानातील सातत्याच्या बदलामुळे तापमान प्रचंड वाढत आहे आणि यालाच काही शास्त्रज्ञ ग्लोबल वॉर्मिंग म्हणतात. हवामानातील सातत्याने होणाऱ्या बदलाचा खरा फटका नेहमी शेतकऱ्यांना बसतो. आता मे महिनाही आला नाही तोच राज्यात अनेक भागांत उभी पिके उन्हात जळून गेल्याच्या बातम्या येत आहेत. ग्रामीण भागात पाण्याची टंचाई याच महिन्यात होते आणि लोक पाणी पाणी करत असतात. मराठवाडा, विदर्भ या कायम दुष्काळी भागात दहा किंवा वीस दिवसांनी पाणी येते. हे दरवर्षी दिसणारे चित्र आहे आणि ते बदलले पाहिजे. पण ग्रामीण भागातील पाण्याचा प्रश्न अतिगंभीर होण्याचे कारण म्हणजे बहुतेक लोक पाण्याच्या दैनंदिन गरजांसाठी भूजलावर अवलंबून राहतात. पाण्याचा बेसुमार उपसा सुरू असतो आणि अनेक तज्ज्ञांनी भूजलाचा स्तर खाली खाली जात असल्याबद्दल चिंता व्यक्त केली आहे. पण सरकारने आणि स्वयंसेवी संस्थांनीही भूजलाचा कमी उपसा करण्यासाठी त्यांचे मन वळवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. पण दुर्दैवाने तसे होत नाही आणि पाण्यासाठी वणवण भटकण्याची वेळ येते. भारतीय हवामान खात्याने जो उष्णतेच्या लाटेचा इशारा दिला आहे, तो संपूर्ण भारतासाठी गंभीर आहे. या उष्णतेच्या लाटेमुळे अनेक दुष्परिणाम होणार आहेत आणि त्यात लोक आजारी पडणे, दुष्काळ, पाण्याची टंचाई निर्माण होणे आणि विजेची मागणी वाढणे अशा अनेक उपसंकटांचा समावेश आहे. आताच अगदी राज्याच्या अनेक भागांत दुष्काळाच्या झळा सुरूच झाल्या आहेत, तर अनेक ठिकाणी पाण्याचे दुर्भिक्ष जाणवू लागले आहे.

# महिला उद्धारक बाबासाहेब आंबेडकर !

भाग २

मनोवृत्तीच्या विरोधकांनी प्रचंड विरोध केला.

या बिल द्वारे बाबासाहेबांनी एक-विवाह पद्धतीला कायदेशीर मान्यता, स्त्रियांना संपती मध्ये समान वाटा आणि सर्व कायदेशीर बाबींमध्ये समान संधीची तरतूद केली होती परंतु कडवे हिंदू नेते आणि विचारवंत यांना स्त्रियांना समान अधिकार देण्याची तयारी नव्हती. हिंदू धर्मावरील आक्रमण अशा प्रतिक्रिया देऊन अशा नेत्यांनी बाबासाहेबांना प्रखर विरोध केला.कारण मनुस्मृतीच्या व्यवस्थेनुसार भारतातील



ब्राह्मणी साहित्यात स्त्रियांना शिक्षणाचा अधिकारच त्यांच्याकडून नाकारला गेला होता. परंपरेने स्त्रीला कायमच जोखंडात ठेवले होते. तिने बालपणी पित्याच्या, तरुणपणी पतीच्या आणि म्हातारपणी पुत्राच्या अधिपत्याखाली राहावे अशी व्यवस्थाच मनुस्मृतीने करून ठेवली होती. अतिशय चलाखीने त्यात सतीची चाल , बाल विवाह आणि विधवा विवाहबंदी सारख्या प्रथा बनवून स्त्रियांना संपत्ती मधून हद्दपार केले होते. स्वतःला उदार मतवादी आणि पुरोगामी म्हणवून घेणाऱ्या राजेंद्र प्रसाद, वल्लभभाई पटेल आणि मदन मोहन मालवीय यांनी त्यांचे खरे रूप दाखऊन संघाशी हात मिळवून बाबासाहेबांना पराकोटीचा विरोध केला होता, ज्या स्त्रीयांसाठी बाबासाहेब इतकी मेहनत घेत होते ते बिल पारित होऊ नये म्हणून एक स्त्री असूनही सरोजिनी नायडू उपोषण करणार होत्या. एक अस्पृश्य व्यक्ती हिंदू धर्मावर भाष्य करतोय म्हणून तथाकथित हिंदू समाजाने बाबासाहेबांविषयी घृणास्पद प्रतिक्रिया दिल्या होत्या इतकेच काय बाबासाहेबांविरुद्ध देशद्रोही, हिंदू धर्माचा शत्रू अशा घोषणा देत मोर्चे काढले होते. सामाजिक एकता आणि बांधिलकी धाब्यावर बसवून काँग्रेस च्या मदतीने एक अस्पृश्य व्यक्तीमुळे हिंदू खतरेमे असे नक्राश्रू हे हिंदू धर्माचे ठेकेदार काढत होते.पिचक्या कण्याचे प्रधानमंत्री सामाजिक दबावाच्या राजकारणाला बळी पडल्यामुळे हे बिल संसदेतून बरखास्त करण्यात आले. बाबासाहेबांनी त्या वेळच्या असलेल्या प्रबुद्ध वर्गातील लोकांना / प्रसार माध्यमांना या बिलाच्या पाठी उभे राहण्यास आवाहन केले परंतु बाबासाहेबांच्या पाठीशी भक्कमपणे कुणी उभे राहू शकले नाही. समाजातील समानतेचे सकारात्मक बदल करण्याची बाबासाहेबांची इच्छा मातीमोल ठरली होती. प्रधानमंत्री नेहरुंच्या कृत्याची बाबासाहेबांना चीड आली आणि दुख ही झाले. सुधारणेच्या युगातही स्त्रियांना समान हक्क द्यायला तुम्ही विरोध का करत आहात, असा सवाल डॉ.आंबेडकरांनी प्रतिगामी विरोधकांना त्यावेळी केला.

हिंदू कोड बिल संमत व्हावे म्हणून बाबासाहेब एकटेच योद्ध्यासारखे लढले. पण दुर्दैवाने सत्र संपताना या बिलाची केवळ ४ कलमेच मंजूर केली गेली.यास्तव अत्यंत दुःखीकष्टी होऊन डॉ.आंबेडकरांनी आपल्या कायदेमंत्री पदाचा राजीनामा दिला. भारतीय स्त्रियांच्या हक्कांसाठी केवढा मोठा त्याग बाबासाहेबांनी केला केवढे ते निस्वार्थी कार्य, केवढी ती महानता !

डॉ. आंबेडकरांनी हिंदू कोड बिल मंजूर करण्यासाठी अतोनात प्रयत्न केले. मात्र डॉ. राजेंद्रप्रसाद, शंकराचार्य, ब्रह्मानंद सरस्वती, स्वामी करपात्री, डॉ. पट्टाभी सीतारामय्या या नेत्यांनी बाबासाहेबांचे प्रयत्न सफल होऊ दिले नाहीत. पण बाबासाहेबांचे हे कष्ट हा त्याग निरर्थक ठरले नाहीत. ज्या वारसा कायद्याला विरोध करण्यात आला होता तो नंबर बाजूला सारून प्रथम हिंदू विवाह कायदा हाती घेण्यात आला. भारतातील महिलांच्या अनिष्ट रूढी परंपरा आदींच्या जोखंडातून सुटका करून त्यांना माणसांचं अस्तित्व बहाल केल्याचे श्रेय बाबासाहेबांना मिळू नये म्हणून गलिच्छ राजकारण करणाऱ्या नेहरूंना 'हिंदू कोड बिला'चे चार वेगवेगळे भाग करून हे चारही कायदे वेगवेगळ्या वेळी मंजूर करून घ्यावेच लागले.कारण त्याशिवाय त्यांना इतिहास माफ केला नसता. १९५५-५६ मध्ये मंजूर झालेले चार हिंदू कायदे म्हणजे-

*हिंदू विवाह कायदा.
* हिंदू वारसाहक्क कायदा
* हिंदू अज्ञान व पालकत्व कायदा
* हिंदू दत्तक व पोटगी कायदा.

हे कायदे मंजूर होणे म्हणजे कायद्याच्या इतिहासातली एक क्रांतिकारक घटना होय. या कायद्यांनी भारतीय स्त्रियांच्या जीवनात आमूलाग्र परिवर्तन घडण्यास सुरुवात झाली. या कायद्यांनी स्त्री-पुरुषांच्या दर्जात कायद्याने समानता प्रस्थापित केली.

आपल्या देशात देव-देऊळ ही कल्पना मांडून त्यांना समर्पक अशा कथा पोथी-पुराणात घुसवून हे देवांनी सांगितले आहे असे सांगून सामान्य लोकांवर धार्मिक गुलामगिरी लादली गेली आहे.आणि ती अजूनही निरंतर सुरू आहे.हा बिनभांडवलीचा धंदा असल्यामुळे अनेक उपटसुंभ भगवे पांघरून आजच्या घडीला देखील लोकांना प्रत्येक परिवारातील महिलांच्या माध्यमातून सर्रास लुबाडताना दिसतात.परंतु अंगावर भगवे डोक्यावर मागच्या बाजूला बुचडा असला की कुणालाच काही बोलता येत नाही.कारण त्यांच्याबद्दल एखादी शंका आपल्या मनात जरी आली तरी स्वतःच्या गालावर चापटा मारुन घेऊन कान पकडणारे मूर्ख माणसं आपण अवतीभवती पाहतो मग त्या बुवा-बाबा, पंडीत-पुजारी आदींवर उघडपणे शंका व्यक्त करणे तर खूप दूरची गोष्ट आहे.कारण आपल्या कडे अशा भ्रामक कथा आणि कथानायकांच्या प्रतिमाच बनविले गेले आहेत.उघडा-नागडा,

केस अस्ताव्यस्त पसरलेले आणि उगाचच आकाशाकडे पाहून हसणारा, डोळे मिचकावणारा, बोटं मोजणारा,गांजा आणि तत्सम नशापान करणारा हा त्यांच्या दृष्टीने अगदी वरच्या श्रेणीतील महाराज समजला जातो. भगवं धारण करुन एखादे मंदिर अथवा मठ हेच आपले मुख्यालय बनवून राज करणाऱ्यांची इथे कमी नाही. कारण यांच्या सुपीक डोक्यातून निघालेल्या कल्पनांमुळेच दर दहा फुटांवर देवळांची निर्मिती करुन त्यांच्या रोजगाराची हमी योजना अस्तित्वात आली आहे. देशावर कुठलीही आपत्ती येवो यांच्या कमाईत कधीच खंड पडत नाही. प्रसंगी लोक स्वतः कर्ज काढून यांच्या उदरनिर्वाहाची सोय करतात.कारण एकच. भीती ! आणि श्रद्धा. भीती याची की असे जर नाही केलं तर आपलं भविष्य अंधकारमय होणार आणि श्रद्धा नव्हे, अंधश्रद्धा अशी की,आपण यांना देणं म्हणजे मोठं पुण्यकर्म ! डायरेक्ट देवालाच पोहोच करणे होय. कारण ती कुणा जीत्या जागत्या आई-बापांची नव्हे तर साक्षात ब्रम्हाची म्हणजेच देवाची लेकरं हे मनात खोलवर बिंबवण्यात आलेले आहे. एवढं प्रस्थ,एवढं महत्व या इथल्या महंत, पुजारी, आचार्यांनी आपल्या बाबत तयार करून ठेवले आहे.जर हिंदू कोड बिल पारित झाले असते तर खूप आधी आणि निश्चित महिलांमध्ये जागृती निर्माण झाली असती आणि महंत मठाधिपती यांच्या ऐतखाऊ वृत्तीला तेव्हाच मूठमाती मिळाली असती. यामुळेच

पुढील सर्व धोके ओळखून या हिंदू कोड बिलला विरोध करण्यासाठी त्यांनीही मोठी आघाडी घेतली. भगवे आणि खादी यांचे घनिष्ठ संगनमत सर्वश्रुत आहेत. वास्तविक सर्वधर्मसमभाव या तत्वानुसार तयार करण्यात आलेले जगातील एक आदर्शवत असे भारतीय संविधान देशात लागू झाल्यानंतर तरी हे विषारी मिश्रण टाकून द्यायला हवं होतं परंतु धार्मिक अधिष्ठान असल्यामुळे उलट असे महंत-आचार्य, महाराज-पंडीत आणि राजकारणी यांनी सहकारी तत्वावर राजकीय वखारी खोलून जोरात व्यवसाय करण्यात व्यस्त होते आणि आजही तोच व्यवसाय मोठ्या प्रमाणात सुरू आहे. मुळात भीतीपोटी देऊळ धर्माचे पालन म्हणून महंत-महाराजांकडे गर्दी होते. मग मतलबी राजकीय नेते त्या गर्दीचे रुपांतर एकगठ्ठा मतदारात करून घेण्यासाठी महाराजांचे आशिर्वाद घ्यायला जातात, त्यांच्या सत्संगात हजेरी लावतात.आणि आपले नेते सत्संगात जातात म्हणून राजकारण्यांचे बगलबच्चे महाराजांकडे रतीब लावतात. असे एकमेकांच्या भेटीबरोबरच अनेक पूरक उद्योग या राजकीय पुढारी आणि महाराज मंडळींमध्ये बिनबोभाट सुरू असतात आणि आजही सुरूच आहेत. केवळ आणि केवळ देव आणि धर्माच्या भीतीने इथली जनता सारासार विचार न करता । **क्रमश :**

पान १ वरुन

## शिक्षक नियुक्ती लांबणीवर..

५७०० जागांची भरतीही रखडली आहे. दरम्यान, शाळांमधील पटसंख्या टिकविण्यासाठी पुरेशा प्रमाणात शिक्षक जरुरी असून शाळा सुरु होण्यापूर्वी नवीन शिक्षकांना नेमणुका मिळाव्यात, राहिलेली भरती पूर्ण करण्यास परवानगी द्यावी, अशी मागणी निवडणूक आयोगाकडे करण्यात आली आहे. त्यासंदर्भातील आयोगाच्या निर्णयानुसार कार्यवाही होईल, असे शिक्षण आयुक्त कार्यालयातील विश्र्वसनीय सूत्रांनी सांगितले. आचारसंहिता संपल्यावर शिक्षक भरतीचा दुसरा टप्पा सुरु होवू शकते, असेही यावेळी सांगण्यात आले

जिल्हास मिळाले २४८ नवीन गुरुजी मात्र आचारसंहिता व सुट्टीचा फटका..

सोलापुर प्राथमिक शिक्षण विभागला पवित्र पोर्टल मार्फत नवीन शिक्षकांची पदे भरण्यात आली आहे. सर्व उमेदवरांचे कागदोपत्रीच पडताळणी झाली मात्र आचारसंहिता व शाळेच्या सुट्या मुळे भावी गुरुजीना मिळेना नियुक्त पत्र

मराठी माध्यम--२४८
कन्नड माध्यम--१५
उर्दु माध्यम--१०

**प्रशांत शिरगुर,**
**समन्वयक स्पर्धा परीक्षा समन्वय समिती महाराष्ट्र**

२०२३ मध्ये अभियोग्यता परीक्षा पार पडली काही तांत्रिक अडचणीमुळे शिक्षक भरती रखडली मात्र आता पहिल्या टप्प्यातील शिक्षक भरती मध्ये सोलापूर जिल्ह्यात आलेले नवीन शिक्षकांची नियुक्ती देणे गरजेचे आहे. त्यामुळे त्यांचा भविष्यतील पदोन्नती बडती पगारवाढ या गोष्टीची अडचण निर्माण होणार नाही. अतिरिक्त शिक्षकांचा प्रश्र्न भावी गुरुजींना अडचणीत आणू शकतो.परिणाम नियुक्ती उशीरा होऊ शकते. व मुळातचं आज उमेदवाराना आर्थिक परिस्थिती खूपचं हालखीची आहे. म्हणून शासनाने गांभीर्याने विचार करून लवकरात लवकर नवीन शिक्षकांना नियुक्ती द्यावी.

**सोनिया मधुकर कांबळे**
**नवनियुक्त शिक्षका जिल्हा परिषद सोलापूर .**

टेट परीक्षा फेंब्रुवारी २०२३ नंतर किमान एक वर्षांनी म्हणजे २५ फेब्रुवारी २०२४ रोजी निवड याद्या जाहीर करण्यात आल्या, निवड याद्या जाहीर केल्यानंतर सुद्धा अजून पर्यंत सोलापूर जिल्हा परिषद मध्ये नियुक्त देण्यात आलेल्या नाहीत. निवड याद्या लागल्यानंतर ४ आणि ५ मार्च रोजी कागदपत्रांची छाननी झाली. पण अद्याप ही समुपदेशन झालेले नाही. कार्यरत शिक्षकांच्या बदल्या अगोदर करा असे पत्र आल्यामुळे नियुक्त्या पुढे ढकलण्यात आल्या, नंतर निवडणुका जाहीर झाली आणि आचारसंहिता लागली त्यामुळे बदलीची प्रक्रिया ही झाली नाही आणि आम्हला नियुक्त्या ही मिळाल्या नाहीत. लवकरात लवकर बदली ची प्रक्रिया पूर्ण करून आम्हाला नियुक्त्या द्याव्यात हीच आमची मागणी आहे.

सर्व प्रकारच्या गुणवत्ता सिद्ध करून ही अजून शाळा मिळाल्या नाहीत, नवीन शिक्षकांच्या पदरी प्रतिक्षाच आहे.

## हजारोंच्या उपस्थितीत प्रणिती शिंदे

सोबत मग मागचे दोन खासदार फिरत नाही तो का तुम्हाला त्याची लाज वाटते का असा खडा सवाल यावेळी प्रणिती शिंदे आणि उपस्थित केला माझे वडील माझ्या खांद्याला खांदा लावून उभे आहेत ही लढाई आपल्या सगळ्यांची लढाई आहे असे शिंदे म्हणाले मी या लोकसभेच्या लढाईला जात असून तुम्ही सर्वांनी विजय आशीर्वाद द्यावा असे आव्हाने प्रणिती शिंदे

महाविकास आघाडी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गट राष्ट्रवादी शरद पवार गट माखप आम आदमी पार्टी समाजवादी पार्टी सगळे आमच्या सोबत आहेत ही लढाई आमच्या सगळ्यांचे असून आपल्या सगळ्यांचा एक शत्रू भाजप आहे याची जागा दाखवून द्यायला पाहिजे सोलापूरची नुकसान झाले आहे त्याच्याबद्दल बदला घेण्याची वेळ आलीये पुन्हा एकदा सोलापूरच्या विकासाचा आणि प्रगतीच्या वाटेवर आणलेली गरज आहे तुम्ही सगळ्यांनी आशीर्वाद द्या मी सोलापूरची लेक माझ्या शेवटच्या श्र्वासापर्यंत तुमच्यासाठी काम करत राहिला

या सभेला संबोधित करताना मेकपचे नेते नरसोबा आडमिनी भाजपवर दो हजार वसाहतीत श्री घेण्याचा प्रयत्न माझ्याकडून केला जात आहे मात्र या योजनेची सुरुवात २०१३ मध्ये काँग्रेस नेत्या सोनिया गांधी यांच्या सांगण्यावरून झाली की आठवण त्यांनी यावेळी करून दिली भाजप सरकारने निधी दिला म्हणजे काय त्यांनी त्यांच्या खिशातून निधी दिलाचा असा संदर्भसंवाद देखील त्यांनी

सोलापूरच्या लेकीसाठी कार्यकर्त्यांची लाट पॉलिटी शिंदे यांच्या अर्ज भरण्याच्या निमित्ताने सोलापूर लोकसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीतील सर्व पक्षाची पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते चित्र पाहायला मिळाली यावेळी युवक युती महिला कार्यकर्त्यांच्या दक्षिणेय सहभाग दिसून आला

प्रणिती शिंदे यांचा उमेदवारी अर्ज दाखल करण्यात प्रसंगी माजी गृहमंत्री सिद्रा मेत्रे माजी आमदार दिलीप माने राष्ट्रवादीचे नेते महेश कोठे सुधीर खरटमल महेश गाडेकर शिवसेना ठाकरे नेते पुरुषोत्तम बर्डे उपनेते शरद कोळी अस्मिता गायकवाड अजय दासरी गणेश वाडकर पाटील उत्तम प्रकाश खंदारे भारत जाधव प्रमोद गायकवाड टोपीचे निमित्त आम आदमी पाटील जिल्हा पाटील शहराध्यक्ष निखिल करणारे समाजवादी पार्टी अध्यक्ष अबू तालीम डोंगरे ज्येष्ठ नगरसेवक बाबा मिस्त्री सुरेश हसापूर यादी मान्यवर नेते मंडळी पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते

## मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांच्या ..

बैलगाडीतून उदयनराजे भोसले, शिवेंद्रसिंहराजे भोसले, अतुल भोसले हे गांधी मैदानावर रॅलीतून आले. तेथून स्वतंत्र सजवलेल्या दोन रथांच्या माध्यमातून महारॅली मार्गस्थ झाली. एका रथावर उदयनराजे भोसलेंसह मान्यवर सहभागी झाले होते. तर दुसऱ्या रथात महायुतीतील घटक पक्षांच्या महिला पदाधिकाऱ्यांसमवेत दमयंतीराजे भोसले याही सहभागी झाल्या होत्या.

गांधी मैदानापासून विराट जनसमुदायाच्या साथीने रॅली राजपथावरून मार्गस्थ झाली. या वेळी उदयनराजे यांच्या समवेत शिवेंद्रसिंहराजे भोसले, महेश शिंदे, अतुल भोसले, धैर्यशील कदम, आनंदराव पाटील, अशोक गायकवाड, तसेच दमयंतीराजे भोसले, सुरभी भोसले, सुवर्णा पाटील, चित्रलेखा माने कदम, आदींसह मान्यवर सहभागी झाले होते. महारॅलीत पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, शंभूराज देसाई, नरेंद्र पाटील, शिवेंद्रसिंहराजे भोसले, महेश शिंदे, आदींचे पोस्टर हातात घेऊन कार्यकर्ते महारॅलीत सहभागी झाले होते. तसेच शिवसेना, भाजपचेच तसेच राष्ट्रवादीचे पोस्टर होते.

सकाळी उदयनराजेंनी ढोल्या गणपती मंदिरात जाऊन दर्शन घेतले. तसेच अदालत वाडा येथे जाऊन काका कै. शिवाजीराजे भोसले, काकी कै. चंद्रलेखाराजे भोसले यांच्या प्रतिमेस अभिवादन करून शुभाशीर्वाद घेतले. त्यानंतर जलमंदिर पॅलेसमधील तुळजाभवानी माता तसेच राजमाता कल्पनाराजे भोसले यांचे शुभाशीर्वाद घेतले. यावेळी पत्नी दमयंतीराजे भोसले यांनी त्यांचे औक्षण केले. त्यानंतर उदयनराजे अर्ज भरण्यासाठी रवाना झाले.उदयनराजेंचा उमेदवारी अर्ज दाखल करताना मुख्यमंत्री शिंदे, उपमुख्यमंत्री फडणवीस, अजित पवार, शंभूराज देसाई उपस्थित होते. अर्ज दाखल केल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उपस्थित जनसमूहाला संबोधित केले.

## पहिल्या टप्प्यासाठी आज

१,६२५ उमेदवार रिंगणात आहेत. निवडणूक शांततेत पार पाडण्यासाठी गेली दोन वर्षे केंद्रीय निवडणूक आयोगाने प्रचंड मेहनत घेतली आहे. मतदारांना मतदानावेळी कोणताही त्रास न होऊ नये याची दक्षता घेण्यात आली आहे.

तर राज्यात निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात पूर्व विदर्भातील नागपूर, रामटेक, भंडारा-गोंदिया, गडचिरोली-चिमूर आणि चंद्रपूर या पाच मतदारसंघात आज, शुक्रवारी मतदान होत आहे. नागपूरमध्ये भाजपचे नितीन गडकरी आणि काँग्रेसचे विकास ठाकरे, रामटेकमध्ये शिवसेनेचे राजू पारवे आणि काँग्रेसचे श्यामकुमार बर्वे, गडचिरोलीत भाजपचे अशोक नेते आणि काँग्रेसचे डॉ. नामदेव किरसान, चंद्रपूरमध्ये भाजपचे सुधीर मुनगंटीवार आणि काँग्रेसच्या प्रतिभा धानोरकर तर भंडारा-गोंदियात भाजपचे सुनील मेंढे आणि काँग्रेसचे प्रशांत पडोळे यांच्यात लढत आहे.

## रेड्यावर बसून उमेदवाराची जोरदार एन्ट्री

सोलापूर/प्रतिनिधीः माढा लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी अर्ज भरण्यासाठी उमेदवार हे चक्क रेड्यावर बसून यमराजाच्या वेशात निवडणूक अधिकारी कार्यालयात आले. देशातील वाढता भ्रष्टाचार रोखण्यासाठी आपणांस संसदेत जायचे आहे. म्हणून लोकसभा लढविण्याचे ठरविल्याचे यमराजाच्या रूपाने उमेदवारी दाखल केलेले अपक्ष उमेदवार राम गायकवाड यांनी सांगितले.

ओबीसी कोट्यातून मराठा आरक्षण मिळावे, वाढत्या भ्रष्टाचारावर आळा बसावा आणि सत्ताधारी पक्षाकडून ईडी व अन्य तपास यंत्रणांचा होणारा गैरवापर टाळावा, यासाठी आपण यमराज बनून येत असल्याचे राम गायकवाड यांनी सांगितले. माढा लोकसभेसाठी उमेदवारी भरण्याकरिता यमराजाच्या पोशाखात रेड्यावर बसून सात रस्त्यावरील जिल्हाधिकारी कार्यालयात आलेल्या राम गायकवाड यांच्याकडे सर्वांचे लक्ष वेधले गेले. या यमराजासोबत सुमारे शंभर कार्यकर्त्यांचा सहभाग होता. माढा लोकसभा निवडणुकीत भाजपचे विद्यमान खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर आणि राष्ट्रवादी शरद पवार गटाचे धैर्यशील मोहिते-पाटील यांच्यात प्रतिष्ठेची लक्षवेधी लढत होत आहे. याच मतदारसंघात यमराज बनून राम गायकवाड यांनी उमेदवारी दाखल केल्यामुळे हा चर्चेचा विषय ठरला आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

आणि शासनकर्ते नमले.....

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकासाठी शहापूर तहसीलदार यांच्या कडून हिरवा कंदील



शहापूर/विजय घनघाव : शहापूर – भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचं स्मारक शहापूर तहसीलदार कार्यालय प्रारंगणात व्हावें याकरिता शहापूर मधील रमाबाई ब्रिगेड महिला संघटना संस्थापक अध्यक्ष ज्योती गायकवाड या गेल्या ७५ दिवसांपासून घर छोडो आंदोलन करीत होत्या... आणि १४ एप्रिल पासून ज्योती गायकवाड यांनी आमरण उपोषण सुरु केले होते.. परंतु अखेर शासनकर्ते नमले... दि. १८ एप्रिल रोजी शहापूर तालुका तहसीलदार कोमल ठाकूर यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे प्रस्ताव मंजूर करावा असे लेखी कागदपत्रांची पूर्तता केली आहे.

व जिल्हा अधिकारी यांनी लवकरात लवकर स्मारकास परवानगी मिळणे बाबत प्रयत्न करू असे आश्र्वासन दिले आहे.खरोखर लोकशाही मार्गाने आपला लढा यशस्वी झाला आहे...आपले वडील बु. भगवान गायकवाड यांनी सुद्धा आपल्या हयातीत या स्मारकासाठी खूप प्रयत्न केले होते... परंतु आता घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर याचं स्मारक आता शहापूर मध्ये लवकरच नावारूपाला येणार आहे.. या आपल्या आंदोलनाला पाठिंबा देणाऱ्या सर्व भीम सैनिकांचे माता भगिनींचे मनापासून अभिनंदन तसेच भदंत शीलबोधी थेरो यांनी आंदोलनात सहभागी होऊन आंदोलनाला यशस्वी केले त्या बद्दल संपूर्ण समाजाच्या वतीने आभार व्यक्त करत... आपलं आमरण उपोषण स्थगित करत... आंदोलनकर्त्या ज्योती गायकवाड यांनी ठाणे जिल्हाधिकारी, पोलीस प्रशासन, तहसीलदार, आणि तमाम आंबेडकरी जनतेला सर्वांना धन्यवाद दिले आहेत..

## डॉ.बी.आर आंबेडकर ग्रूप संकुल यांच्या तर्फ डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी



ठाणे : डॉ. बी .आर आंबेडकर ग्रूप संकुल बदलापूर यांच्या विद्यमाने दि.१४ एप्रिल २०२४ रोजी विश्र्वरत्न, महामानव डॉ. बाबसाहेब आंबेडकर यांचा १३३ वी जयंती मोठ्या जल्लोषात, थाटामाटात पनवेलकर संकुल या ठिकाणी साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरवात महापुरुषांच्या प्रतिमेला पुष्पहार, दिपप्रज्वलन बौध्दाचार्य भगवान जाधव यांच्या कडून बुद्धवंदना पार पडली. कार्यक्रमाला प्रमुख वक्ते भारतीय बौद्धमहासभा बदलापुर शहर (हिशोब तपासनीस) सुहास गंडाकुश उपस्थित होते. त्यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. त्याचप्रमाणे कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती सामाजिक कार्यकर्ते महेश जाधव आणि सामाजिक कार्यकर्त्या प्रतिभाताई जाधव होत्या. लहान मुलांच्या कलेला वाव मिळावा या हेतूने विविध मनोरंजन कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. अनेक मुला- मुलींनी महापुरुषांच्या जीवना आधारित भाषणे सादर केली. त्याचप्रमाणे अनेकांनी नृत्य सादर केले. सहभागी झालेल्या सर्व स्पर्धकांना बक्षिस देण्यात आले. संपूर्ण कार्यक्रम यशस्वी करण्यात डॉ. बी. आर. आंबेडकर ग्रूप संकुलच्या सर्वच युवकांनी मोलाचे योगदान दिले. अनेकांनी आर्थिक सहाय्य केले आणि कार्यक्रमाला उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली अशा सर्व बंधू भगिनिंचे आभार व्यक्त करण्यात आले.

## मतदान जनजागृती बाबत 9 मे रोजी आजी आजोबा पालक मेळावा



निफाड/प्रतिनिधी : नाशिक जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षण विभाग नाशिक निवडणूक निर्णय अधिकारी व नाशिक जिल्हा मुख्याध्यापक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने उ च् उ ड कॉलेज नाशिक येथे शिक्षण उपशिक्षणाधिकारी उदय देवरे यांच्या अध्यक्षतेखाली नाशिक म न पा व ९ तालुके या शाळांच्या मुख्याध्यापकांचे स्वीप अंतर्गत मतदान जनजागृती मोहीम राबविण्यात आली.

यात शाळांनी मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी शाळा स्तरावर राबविलेल्या उपक्रमाचा आढावा घेणे व त्याचे रेकॉर्ड शाळा स्तरावर अद्यावत ठेवणे व २० मे पर्यंत शाळा स्तरावर मतदान जनजागृती साठी व मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी वेगवेगळ्या योजनांची माहिती देण्यात आली. मुख्याध्यापकांना वेगवेगळ्या सूचना देण्यात आल्या मतदानाचे बूथ शालेय परिसरात असेल तर सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याची जबाबदारी मुख्याध्यापकांची असेल १ मे महाराष्ट्र दिनानिमित्त विद्यार्थी व पालक प्रगती पुस्तक घेण्यासाठी त्यांच्या आजी आजोबांसह हजर ठेवून त्यांची मिटिंग घेऊन मतदान जनजागृती करणे आचारसंहितेचे उल्लंघन होणार नाही

याची काळजी घेणे अशा सूचना मुख्याध्यापकांना देण्यात आल्या शाळा स्तरावर विविध उपक्रमांची पीपीटी तयार करून, ती शिक्षणाधिकारी प्रवीण पाटील यांच्या मेलवर पाठवावी या संदर्भातील कार्यशाळा संपन्न झाली या कार्यशाळेसाठी व्यासपीठावर उपशिक्षणाधिकारी उदय देवरे गणेश फुलसुंदर प्रकाश अहिरे एम ओ पिंगळकर नाशिक जिल्हा मुख्याध्यापक संघाचे सचिव एस बी देशमुख उपाध्यक्ष प्रदीप सांगळे, एस ए पाटील बाबा खरोटे, डॉ अनिल माळी एम डी काळे रोहित गांगुर्डे यांच्यासह ४५० पेक्षा जास्त मुख्याध्यापकानीं या कार्यशाळेचा लाभ घेतला.

## घोळसगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात साजरे



अक्कलकोट/महेश गायकवाड :घोळसगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन १६ एप्रिल रोजी सायंकाळी श्री शंभू महादेव यात्रेनिमित्त अति उत्साहात पार पडले . शाळेच्या मुलांच्या विविध गुण दर्शनाचा कार्यक्रम पाहण्यासाठी गावातील बहुसंख्य नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते. प्रेक्षकांच्या गर्दीने महादेव मंदिराचे पूर्ण पटांगण भरलेले होते, कार्यक्रमाचा अध्यक्षस्थानी अक्कळजोट पंचायत समितीच्या माजी उप सभापती सौ सोनाबाई इराण्णा आलुरे या होत्या . कार्यक्रमाचे उद्घाटन ग्रामपंचायत सदस्या सौ पार्वती नागेश पालापुरे यांच्या शुभ हस्ते करण्यात आले. तर प्रतिमा पूजन सरपंच राजशेकर किवडे व संजय होळे यांचे हस्ते करण्यात आले. स्टेज पूजन मल्लिनाथ हापाळे व मल्लिकार्जुन गौरकर यांच्या हस्ते झाले . संगीत पूजन महांतेश्र्वर कोतले व मल्लिनाथ सोळशे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रम चे दीपप्रज्वलन सौ जयश्री दिलीप पाटील श्री प्रशांत पटणे सर श्री याकूब मुल्ला, आणि बालाजी कांबळे श्री प्रदीप कोतले श्री खंडेराव साळुंखे या सर्व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमास प्रमुख अतिथी गट शिक्षणाधिकारी प्रशांत आरबाळे हे उपस्थित होते.

दयानंद कवडे विस्तार अधिकारी, बापूराव चव्हाण, केंद्रप्रमुख श्री बसवराज मुनोळी केंद्रप्रमुख वागदरी श्री शिवशंकर त्रिगुळे पत्रकार व श्री विश्र्वास सोनवणे टाटा पॉवरचे अधिकारी उपस्थित होते. विशेष म्हणजे पहिली ते सातवी सात वर्ग आणि चार शिक्षक अवघ्या दहा दिवसांमध्ये मुलांना शिकवत परीक्षा घेत अतिशय सुंदर असे गाणे व नाट्य बसविलेले होते. श्री सोमनाथ मोरे सर श्री रामेश्र्वर दरेकर सर श्री अमोल गुंजोटी सर श्री अजित ठाकूर सर व श्रीमती प्रतिक्षा डाळे मॅडम यांनी अतिश्रम परिश्रम घेतले. कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी श्री दिलीप पाटील श्री मल्लिकार्जुन आलुरे श्री राजेंद्र काळे सतीश पालापुरे राजेंद्र समन मल्लिनाथ हडपद , आरिफ दिवटे, विजयकुमार पाटील उमेश साळुंखे अल्ताफ फकीर परमेश्र्वर आलूरे अमोल पाटील अब्दुल मकानदार नर्सिंग काळे, सोमनाथ बादोले असे अनेक गावातील नागरिक सहकार्य केले विशेष म्हणजे स्टेज वरती अंगणवाडी सेविका बचत गट सीआरपी उपस्थित होते. कार्यक्रमास उपस्थित असलेले सर्व मान्यवर व माजी विद्यार्थी यांचा ही यावेळी सत्कार करण्यात आला .तसेच श्री आर बाळे सर व श्री बापूराव चव्हाण यांनी मार्गदर्शन केले व तसेच माजी विद्यार्थ्यांमधून मल्लिनाथ सोळसे इंजिनियर व सरकारी वकील याकूब मुल्ला यांनी आपले मनोगत व्यक्त केले

सयाप्रसंगी उमेश साळुंखे व गावातली सर्व नागरीक आणि विविध मंडळांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मनसेचे नेते दिलीप धोत्रे यांनी सोलापूर व माढा लोकसभा मतदारसंघाची घेतली आढावा बैठक



पंढरपूर/प्रतिनिधीः मोदींना पंतप्रधान करण्यासाठी मनसे सज्ज माढा आणि सोलापूर मतदारसंघातील प्रमुख पदाधिकारी यांची उपस्थिती माढा व सोलापूर लोकसभा निवडणुकीत मनसेचे प्रमुख राज ठाकरे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पाठिंबा दिला आहे त्यानुसार मनसेचे नेते दिलीप धोत्रे यांनी आज गुरुवारी पंढरपूर येथील मनसे कार्यालयाच्या प्रमुख पदाधिकारी यांची आढावा बैठक घेतली यामध्ये सोलापूर आणि माढा लोकसभा मतदारसंघातील भाजपचे उमेदवार यांना मोठ्या मध्ये मताधिक्याने विजयी करण्यात निर्धार व्यक्त करण्यात आला

राज ठाकरे यांनी संपूर्ण राज्यातील निवडणुकीत सुसूत्रता यावी यासाठी मनसेच्या वरिष्ठ पदाधिकारी यांच्यावर जबाबदारी सोपवण्यात आली होती यामध्ये माढा आणि सोलापूर बारामती लोकसभा मतदारसंघाची जबाबदारी दिलीप धोत्रे यांच्यावर गुरुवारी सकाळी अकरा वाजता माढा आणि सोलापूर मतदारसंघातील प्रमुख पदाधिकारी यांच्या समवेत आढावा बैठक घेण्यात आली या घेण्यात आलेल्या बैठकीत महायुतीचे नेते सोबत समवय साधण्यासाठी नियोजन करण्यात आलेल्या निवडणूक प्रचार आणि मोठ्या सभांमध्ये नियोजन ठरविण्यात आले यावेळी माढा मतदारसंघातून खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर आणि सोलापूर मतदार संघातून राम सातपुते यांच्यासाठी सर्व मनसे कार्यकर्त्यांनी जिवाजी रान करून मोठ्या मते अधिक त्याने विजयी करण्याचा निर्णय व्यक्त यावेळी भाजपचे शिक्षकांत चव्हाण भास्कर कद गावडे ही भाजपचे प्रतिनिधी म्हणून उपस्थित होते मनसेचे जिल्हाध्यक्ष विनायक महिंद्रकर प्रशांत इंगळे दैनंदिन शेख अमर कुलकर्णी रमजान ताई इंगोले शाहू राजे देशमुख अनिल केदार शशी पाटील मारुती वाघमोडे चंद्रकांत पवार सतीश फंड किसान पाटील मारुती ताई चौगुले शंकर खाडे स्वप्निल नागणे स्वप्नील कोळी दिगंबर शिंगाडे नागे हिंगोली सचिन कसबे नारायण गोविंद सोलापूर आणि माढा लोकसभा मतदारसंघातील प्रत्येक तालुक्यातील मनसेचे तालुकाध्यक्ष शहराध्यक्ष आणि जिल्ह्यातील प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते

## पंढरपूरात स्वीप अंतर्गत मतदार जनजागृती

✻ दर्शन रांगेतील भाविकांना गुलाब पुष्प व माहिती पत्रके देऊन मतदान करण्याचे केले आवाहन ✻ स्वीप व भारत विकास परिषद स्वंयसेवी संस्थेच्या संयुक्त विद्यमाने मतदार जागृती



पंढरपूर/प्रतिनिधीः लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीत मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी तसेच नागरिकांना मतदानाचे महत्व सांगण्यासाठी प्रशासनकडून स्वीप मोहिमेंतर्ग विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. निवडणुकीच्या माध्यमातून लोकशाहीच्या या उत्सवात जास्तीत जास्त मतदारांनी सहभाग घ्यावा.यासाठी मतदार जनजागृती करण्यात येत असून,

चैत्री यात्रेनिमित्त श्री विठ्ठल-रुक्मिणीमातेच्या दर्शनासाठी आलेल्या भाविकांना दर्शन रांगेत गुलाब पुष्प व मतदानाबाबत माहिती पत्रके देवून मतदार जागृती करण्यात आली. स्वीप मोहिमेतर्गत आज ४२ सोलापूर लोकसभा मतदार संघातील २५२ पंढरपूर विधानसभा मतदारसंघामध्ये सहा. निवडणूक निर्णय अधिकारी सचिन इथापे यांच्या मार्गदर्शनाखाली व भारत विकास परिषद स्वयंसेवी संस्थेच्या संयुक्त विद्यमाने सारडा भवन येथील दर्शन रांगेत मतदार जागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बालविकास प्रकल्प अधिकारी तथा स्वीप नोडल अधिकारी समाधान नागणे, जगन्नाथ गारोळे, सहा स्वीप नोडल अधिकारी अस्मिता निकम, भारत विकास परिषदेचे अध्यक्ष मंदार लोहोकरे, सचिव डॉ अनिल पवार , संस्थापक अध्यक्ष डॉ सुरेंद्र काणे, डॉ वर्षा काणे, निलीमा माळी, भाग्यश्री लिहणे, राजेंद्र केसकर, अजित कुलकर्णी आदी उपस्थित होते.

चैत्री यात्रे निमित्त पंढरपूरात राज्यातील विविध जिल्ह्यातून मोठ्या प्रमाणात भाविक दाखल झाले आहे. लोकसभा निवडणुकीत प्रत्येक नागरिकांनी आपला मतदानाचा हक्क बजवावा यासाठी मतदानाचे महत्व पटवून मतदान करण्याचे आवाहन केले. तसेच रेल्वे स्टेशन, बस स्थानक, आपत्ती व्यवस्थापन कक्ष, दर्शन रांग, पत्राशेड,६५ एकर येथे मतदान जागृतीचे फलक लावण्यात आले आहेत. मतदान प्रकियेतील महिला तसेच नवमतदार असलेली युवापिढी यांचा सहभाग अधिक संख्येने वृध्दींगत करण्यासाठी स्वीप अंतर्गत विशेष भर देण्यात आला आहे. तालुक्यात बचत गट, अंगणवाडी सेविका, आशा वर्कर यांच्या बीट विभागात सभा घेवून महिला व युवापिढी यांचे मतदान वाढविण्याबाबत जनजागृती केल्याचे बालविकास प्रकल्प अधिकारी तथा स्वीप नोडल अधिकारी समाधान नागणे यांनी सांगितले.

# ...तर वृत्तपत्र खरेदी करणाऱ्याना आयकरात सूट देण्याची मागणी करणार

## महायुतीचे उमेदवार महादेव जानकर यांची प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांना ग्वाही



परभणी लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार महादेव जानकर यांना मानवत येथे भेटून महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी चर्चा करून मागणीचे निवेदन दिले.

परभणी : परभणी लोकसभा मतदारसंघातून आपण विजयी होवून लोकसभेत गेल्यानंतर वृत्तपत्र खरेदी करणार्यांना उत्पन्न करात वार्षिक ५ हजार रुपये सूट द्यावी, ही पत्रकार संघाची मागणी संसदेत प्रभावी मांडू, अशी ग्वाही महायुतीचे उमेदवार महादेव जानकर यांनी प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांना दिली. स्थानिक पातळीवरील छोटी वर्तमानपत्रे सर्वसामान्यांच्या प्रश्नांचा ओहापोह करतात. स्थानिक प्रशासनाला समस्या लक्षात आणून देतात. त्यामुळे या वृत्तपत्रांना आर्थिक पाठबळ मिळाले पाहिजे यासाठी पत्रकार संघाची मागणी आपण लावून धरू असेही त्यांनी स्पष्ट केले.

परभणी लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार महादेव जानकर यांची मानवत येथे बुधवारी (दि.१७) रोजी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी भेट घेवून केंद्र सरकारने वृत्तपत्रांना आर्थिक मदत व्हावी यासाठी वृत्तपत्र खरेदी करणार्यांना आयकरात वार्षिक पाच हजार रूपयाची सुट द्यावी याबाबतची भूमिका सांगितली. जानकर यांनी याबाबत सविस्तर चर्चा करून महाराष्ट्रासह देशभरातील छोट्या मोठ्या वृत्तपत्रांचे प्रश्न, पत्रकारांची आर्थिक परिस्थिती याबाबत माहिती घेतली आणि पत्रकार संघाने केंद्र सरकारकडे केलेली मागणी रास्त आहे. लोकसभेत गेल्यानंतर आपण या मागणीसाठी सुरूवातीलाच सभागृहात आवाज उठवू अशी ग्वाही दिली. जिल्हा, तालुका, गावपातळीवरील छोटी वर्तमानपत्रे सार्वजनिक समस्यांचा ओहापोह करतात. सर्वसामान्य माणसांच्या समस्यांना स्थानिक प्रशासनासमोर प्रभावीपणे मांडतात. त्यामुळे छोटी वृत्तपत्रे जगली पाहिजेत ही पत्रकार संघाची भूमिका लोकशाहीला अधिक बळकट करणारी आहे. पत्रकार संघाने केलेली मागणी व्यवहारी असून सरकार सकारात्मक भूमिका घेईल असा विश्वास असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. यावेळी पत्रकार संघाचे मराठवाडा विभागीय अध्यक्ष वैभव स्वामी, राज्य कार्यकारणी सदस्य बाबासाहेब देशमाने यांच्यासह स्थानिक पत्रकार उपस्थित होते.

### पत्रकारांच्या प्रश्नाकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न : वसंत मुंडे

देशभरात पत्रकारांना काही प्रश्न असतात असा विचारच सरकारमध्ये असलेल्या सत्ताधिशांना येत नाही. राज्यकर्तेही पत्रकारांच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करतात. कोरोनानंतर वर्तमानपत्र व्यवसाय आणि पत्रकारांना मोठ्या समस्यांना सामोरे जावे लागत असले तरी याकडे कोणाचेच लक्ष नाही. त्यामुळे वृत्तपत्र व्यवसायाला उर्जितावस्था मिळावी यासाठी पत्रकार संघाने लोकसभा निवडणूकीच्या मैदानात असलेल्या सर्वपक्षीय उमेदवारांना केंद्र सरकारने वृत्तपत्र खरेदी करणार्यांना आयकरात वार्षिक पाच हजाराची सुट द्यावी या मागणीचे निवेदन देवून पाठींबा मिळवण्यास सुरूवात केली आहे. उमेदवारांनीही मागणीला पाठींबा दिला आहे. त्यामुळे निवडणूकीच्या मैदानात सर्वसामान्यांच्या प्रश्नाबरोबरच पत्रकारांच्या प्रश्नाकडेही आता लक्ष वेधले जात असल्याने आगामी काळात याबाबत सकारात्मक निर्णय होईल अशी अपेक्षा वसंत मुंडे यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केली.

# जि. प. केंद्रीय प्राथमिक शाळेत विद्यार्थी व पालक मेळाव्याचे आयोजन



कळंब/प्रतिनिधि : तालुक्यातील ईटकुर येथे जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत गुढी पाडवा प्रवेश वाढवा शाळा स्तरावर विद्यार्थी व पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

हा मेळावा घेण्याचा उद्देश विद्यार्थांना शाळा आपलीच आहे आनंददायी वातावरण निर्माण केल्यामुळे शाळेविषयी भिती न राहता या मुलांना यावेळी खाऊ,फुगे,फुले व चित्रमय पुस्तके शाळेच्या वतीने वाटप करण्यात आली. विद्यार्थी आनंदाने दोरीवरील उडया ,चेंडू पकडणे, चित्र रंगवणे, यासर्व क्रियामधून विद्यार्थ्याचा भावनिक, शारिरीक, मानसिक विकास कितपत झाला आहे याची पाहणी आनंददायी पध्दतीने केल्यामुळे विद्यार्थी भयमुक्त झाले.हा मेळावा समग्र शिक्षा अभियान धाराशिव यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला..यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका सौ.शारदा मुंडे व सर्व शिक्षक वृंद यांनी कार्यक्रमाचे आयोजन केलेले होते. या पालक मेळाव्याला ईटकुर गावातील प्रवेश पात्र विद्यार्थी व त्यांचे पालक,अंगणवाडी सेविका गावातील सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते..

# भाविकांना दर्शन रांगेत शुध्द पिण्याचे पाणी, लिंबू सरबत, खिचडीचे वाटप


पंढरपूर/प्रतिनिधीः चैत्री शुध्द एकादशी १९ एप्रिल रोजी संपन्न होत असून, या चैत्री यात्रा कालावधीत श्री विठ्ठल-रुक्मिणीमातेच्या दर्शनासाठी लाखो भाविक येतात. सध्या उन्हाळा सुरु असून, दिवसेंदिवस तापमानात वाढ होत आहे. भाविकांना उन्हाचा त्रास जाणवू नये यासाठी पत्राशेड व दर्शनरांगेत आवश्यक उपाययोजना केल्या आहेत. तसेच दर्शन रांगेतील भाविकांना दशमी, व द्वादशी दिवशी तांदळाची खिचडी, एकादशी दिवशी साबुदाण्याची खिचडी त्याचबरोबर लिंबू सरबत अथवा मठ्ठा मोफत वाटप करण्यात येणार असल्याचे मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सांगितले. याचा शुभारंभ गुरुवार दिनांक १८ एप्रिल २०२४ रोजी सकाळी ९.३० वाजता करण्यात आला. यावेळी मंदिर समितीच्या सदस्या श्रीमती शकुंतला नडगिरे, ह भ प श्री ज्ञानेश्र्वर देशमुख जळगावकर, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, व्यवस्थापक बालाजी पुदलवाड तसेच विभाग प्रमुख ज्ञानेश्र्वर कुलकर्णी, बलभीम पावले व भीमाशंकर सारवाडकर उपस्थित होते.त्याचबरोबर यात्रा कालावधीत दर्शन रांगेतील भाविकांना थंड व शुद्ध पिण्याचे पाण्याचे वाटप करण्यात येत आहे. तसेच आरोग्य सुविधा, लाईव्ह दर्शन व्यवस्था मंदिर आदींची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. मंदीर समितीमार्फत यात्रा कालावधीत दर्शन रांगेतील भाविकांना दिल्या जाणाऱ्या सोई सुविधा आवश्यकतेनुसार वाढवण्यात येत असल्याचे मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सांगितले.



# स्वेरी हे आदरयुक्त शिस्तीचे माहेरघर : चंद्रकांत देसाई

## स्वेरीज् बी. फार्मसीमध्ये पालक मेळावा संपन्न

पंढरपूर/प्रतिनिधीः 'ज्या ठिकाणी विद्यार्थ्यांच्या कलागुणांमध्ये प्रगती दिसून येते, त्याठिकाणच्या शिक्षणात कोणत्याही गोष्टीची कमतरता नसते. कोणत्याही क्षेत्रात जा तेथे कष्ट आणि संघर्षाशिवाय यश बिलकुल मिळत नाही. 'स्वेरीमध्ये संस्थापक सचिव डॉ. बी.पी. रोंगे सरांच्या मार्गदर्शनाखाली मिळणारे शिक्षण हे उत्तम प्रकारचे असून आमच्या पाल्यांचा या ठिकाणी शैक्षणिक विकास होत आहे. शिक्षण तर सर्वत्र मिळते पण शिक्षणाबरोबरच आदरयुक्त शिस्त व स्वावलंबीपणा स्वेरीतून मिळतो. त्यामुळे आम्ही पालक वर्ग येथील शिक्षणाबाबत मनापासून समाधानी आहोत. पालकांना नेमके काय पाहिजे हे ओळखून स्वेरीने तशी शिक्षण व्यवस्था उपलब्ध करून दिली असून शिक्षणासाठी होत असलेल्या पाठपुराव्यामुळे आमचे पाल्य वेळ वाया न घालवता केवळ शिक्षणाकडेच वळतात. या सवयीमुळे आमचे पाल्य प्रगती साध्य करत असल्याचे दिसून आले. एकूणच स्वेरी हे आदरयुक्त शिस्तीचे माहेरघर असल्यामुळे आमचे पाल्य प्रगतीपथावर आहेत.' असे प्रतिपादन पालक प्रतिनिधी चंद्रकांत देसाई यांनी केले.




गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये बी.फार्मसी, डी.फार्मसी व एम.फार्मसीच्या वतीने आयोजिलेल्या पालक मेळाव्यात पालक प्रतिनिधी व कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून चंद्रकांत देसाई हे उपस्थित पालक व प्राध्यापकांसमोर आपले मनोगत व्यक्त करत होते. यावेळी महिला पालक प्रतिनिधी म्हणून सौ. क्रांती भारत नागणे व सौ. वैशाली विलास डुबल ह्या व्यासपीठावर उपस्थित होत्या. दीपप्रज्वलनानंतर प्रास्तविकात प्राचार्य डॉ. एम.जी. मणियार म्हणाले की, 'पालक आणि शिक्षक यांचा सुसंवाद व्हावा व त्यातून विद्यार्थ्यांची प्रगती व्हावी या हेतूने पालक मेळाव्याचे आयोजन केले जाते. यामुळे पाल्यांच्या शैक्षणिक प्रगतीकडे पालकांचे लक्ष राहते तसेच पाल्य अधिक सावध होवून अभ्यासावर लक्ष केंद्रित करतो आणि त्याचा फायदा भविष्यात त्यांनाच होतो तसेच पालकांच्या अडचणीबाबत महाविद्यालयाला देखील सुचनाद्वारे बदल व विकास साधता येतो' असे सांगून महाविद्यालयाला मिळालेले एन.बी.ए. मानांकन तसेच 'अविष्कार' मध्ये यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांच्या यशाकडे त्यांनी सर्वांचे लक्ष वेधले. प्लेसमेंट विभागाचे प्रा.पी.ए.जाधव यांनी 'फार्मसी पदवी प्राप्तीनंतर विद्यार्थ्यांना पुढे नोकरीच्या संधी कशा उपलब्ध होतात, संशोधन विभागातील कार्ये, गुणवत्ता यादीतील विद्यार्थ्यांना मिळणारी शिष्यवृत्ती, ट्रिपल पीई, प्रॉक्टर, प्राणायम, नाईट स्टडी, प्रिलिमिनरी एक्झामिनेशन, जी.पी.ए.टी. (ग्रॅज्युएट फार्मसी ॲप्टीटयूड टेस्ट) सेशन, टीपीओ सेशन, बॅकलॉग क्लासेस तसेच पेटंट, कमवा आणि शिका' योजना, सोलार पॉवर प्लांट, प्ले ग्राउंड, व्यायामासाठी जिमखाना, वाचनालयात उपलब्ध असलेली अभ्यासक्रमाची व स्पर्धा परीक्षेसाठी लागणारी संदर्भ पुस्तके, प्रयोग शाळेत उपलब्ध रसायने, वसतिगृहातील सुविधा, फीडबॅक सिस्टम तसेच औषधांची निर्मिती कशी होते हे पाहण्यासाठी थेट इंडस्ट्रीयल व्हिजीट आदी फार्मसी अभ्यासक्रमाशी निगडीत आवश्यक सुविधांची सविस्तर माहिती दिली. यावेळी अंबादास खराडे व उदय बागल या पालकांनी मनोगत व्यक्त करून आपण समाधानी असल्याचे सांगितले. यावेळी सोलापूर जिल्ह्यासह लगतच्या जिल्ह्यातील असे मिळून जवळपास १०० पालक, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. प्रा.एस.डी.पाटील व प्रा.एल.एन.पाटील यांनी समन्वयक म्हणून काम पाहिले. प्रा.एच.बी.बनसोडे यांनी सूत्रसंचालन केले तर डी.फार्मसीचे विभागप्रमुख डॉ. जे.बी. कंदले यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# समाज कल्याण मागासवर्गीय वसतीगृहात डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी

देवरी : येथील मागासवर्गीय मुलींचे शासकिय वसतीगृहात येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयली साजरी करण्यात आली. यावेळी सर्वप्रथम डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला माल्यार्पण व दिपप्रज्वलन करून कार्यक्रमाला सुरवात झाली. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वसतीगृहाच्या प्रभान गृहपाल श्रीमती उज्वला एच. तिरपुडे घ्या उपस्थित होत्या.

यामध्ये विद्यार्थीनींनी बानासाहेबांच्या जिवनावर आधारित विद्याधीनीनी श्रापले मनोगत व्यक्त केले. तसेच काही विद्यार्थीनी भीमगीत गायन केले.



त्यानंतर वेशभूषा स्पर्धा घेण्यात आली. यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर व माता रमाई योधी वेशभूषण करण्यात आणि यामध्ये संजीवनी अंबर वाडे, माता रमाई व स्फूर्ती चवरे या विद्यार्थीनीनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची वेशभुवा साकारली होती. यामध्ये विद्यार्थीनीनी सहभागी होऊन. कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडले. या कार्यक्रमाचे संचालन प्राची जनबंधू तर श्रेयशी मेश्राम हिने आभारप्रदर्शन मानले.

त्यानंतर चित्रकला स्पर्धा घेण्यात आली यामध्ये एकुण व विद्यार्थीनी सहभागी झाल्या होत्या प्राची जनबंधू या विद्यार्थीनीने स्वाती चौरे, तेयाशी मलाम पुरा विद्यार्थीनीनी क्रमांक पटकाविण अशाप्रकारे था ही स्पर्धा पार पडली. १४/४/२०२४ निबंध स्पर्धा मागासवर्गीय मुलींचे शासकिय वसतीगट देवरी येथे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती साजरी करण्यात आली. आंबेडकर योग्या प्रतिमेला दीपप्रज्वलन व माल्यार्पण करून कार्यक्रमाला सुखात करण्यात आली.

या बाबासाहेब आंबेडकरर यांच्या १३३ व्या जयंतीचे औचीत्य साधून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित निबंध स्पर्धा घेण्यात आली.

या निबंध स्पर्धेमध्ये विद्यार्थीनीनी उत्साह सहभाग दर्शवला. या स्पर्धेत एकुण १२ विद्यार्थीनी सहभागी झाल्या होत्या. कु. प्रेरणा मेश्राम वर्ग ११ वा हिने प्रथम क्रमांक पटकाविला.

प्रश्र्न मंजुषा स्पर्धा १६/०४/२०१४- मागासवर्गीय मुलिचे शासक्रिय वसतीगृह देवरी येथे १३३ व्या जयंतीचे औचीत्य सम्भूल साप्ताहिक डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारीत प्रश्र्नमंजुषा स्पर्धा आयोजीत करण्यात आली होती. यावेळी वसतीगृहातील विद्यार्थीनीचे स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय असे चार गट पाडण्यात आले, प्रत्येक गटामध्ये तीन विद्यार्थीनीया समावेश होते. यामस्ये स्वातंत्र्य गट म्हणजेच मिन्सी रविंद्र कोचे, प्रेरणा देवेद्र मेसाम, भाग्यलक्ष्मी मोब्बे या विद्यार्थीनी विजेता पर पटकाविला. या स्पर्धेला वसतीगृहाच्या प्रभारी गृहपाल श्रीमती उज्वला तिरपुडे ह्या उपस्थित होत्या. या वसतीगृहातील सर्व विद्यार्थीनी यांचे उत्तम सहकार्य लागले. अशाप्रकारे ही स्पर्धा अतीशय आल्हाददायक वातावरणात पार पडली.

# प्रणिती शिंदे यांना खासदार म्हणून दिल्लीला पाठवणार : भगीरथ भालके

पंढरपूरःदिवंगत नेते भारत नाना भालके यांचे चिरंजीव भगीरथ भालके बालके गटाच्या वतीने महाविकास आघाडीच्या उमेदवार प्रणिती शिंदे यांना पाठिंबा देण्यात आला आहे. बुधवारी बघितली यांनी काँग्रेस नेते सुशीलकुमार शिंदे व आमदार काँग्रेसच्या उमेदवार पनिती शिंदे यांचा उमेदवारी अर्ज भरण्याचा आदल्या दिवशी यांची भेट घेतली होती फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत दरम्यान काँग्रेसचे उमेदवार पनिती शिंदे यांचा उमेदवारी अर्ज भरण्याच्या दिवशी ते काँग्रेसच्या स्टेजवर दाखल झाले. यावेळी बोलताना म्हणाली की देऊळच नेते भारत भालके यांनी मागील तीन निवडणुकीमध्ये काँग्रेसचे नेते सुशीलकुमार शिंदे यांना पंढरपूर आणि मंगळवेढा मतदारसंघातून मताधिक्य दिले आहे तेच मताधिके यंदाही कायम राहिला असा शब्द मी देतो आणि येणाऱ्या चार जून रोजी पुण्यतिथी शिंदे यांना खासदार म्हणून दिल्लीला जातील असाही मनोगत त्यांनी व्यक्त केला.



# लोकसभा निवडणुकीसाठी ४५० मतदान केंद्रांचे नियंत्रण युवा कर्मचारी करणार

मुंबई : आगामी लोकसभा निवडणुकांसाठी राज्य शासनाच्या सेवेत असलेले युवा कर्मचारी केंद्राचे संपूर्ण नियंत्रण करणार आहेत. युवा कर्मचारी नियुक्त एकूण ४५० मतदान केंद्रे राज्यभरात असणार आहेत. या युवा कर्मचाऱ्यांना मतदानाच्या दिवशी मतदान केंद्रावरील मतदान प्रक्रिया जबाबदारीचे प्रशिक्षण देण्यात आले आहे.राज्य शासनाच्या सेवेत विविध विभागांमध्ये युवा कर्मचारी आहेत. अशा सर्व युवा कर्मचाऱ्यांना लोकसभा निवडणूकीचे कामकाज देण्यात आले आहे. प्रत्येक मतदान केंद्रांमध्ये वेगवेगळया जबाबदाऱ्या देऊन युवा कर्मचाऱ्यांना नियुक्त करण्यात आले आहे. युवा मतदारांना प्रोत्साहन देण्यासाठी यावर्षीपासून निवडणूक आयोगाने नवीन उपक्रम राबविण्यास पुढाकार घेतला आहे. यानुसार प्रत्येक जिल्ह्यातील किमान एक मतदान केंद्र युवा कर्मचारी संचलित असावे यावर भर देण्यात आला आहे.ठाणे जिल्ह्यात सर्वांत जास्त म्हणजे एकूण ३६ मतदान केंद्रांचे नियंत्रण युवा कर्मचाऱ्यांकडे असणार आहे. रत्नागिरी आणि नाशिकमध्ये ३०, लातूरमध्ये २९ मुंबई उपनगरमध्ये २६ युवा कर्मचारी नियंत्रित मतदार केंद्र असणार आहेत.